# महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
# ग्राहक तक्रार निवारण मंच
# कोल्हापूर परिमंडळ, कोल्हापूर

MAHADISCOM
Maharashtra State Electricity Distribution Co. Ltd.

---

सं.क्र.काअ/ग्रातनिमं/कोप/ ३७/२०१४-१५/१२३ दिनांक : ३१.७.२०१४

**<u>आदेश केस क्र.३७/१४-१५</u>**

श्री.दिनकर आत्माराम जाधव,
मु.पो.राजापूर, ता.तासगांव,
जि.सांगली. — अर्जदार

**विरुध्द**

१) कार्यकारी अभियंता (का) तथा नोडल ऑफीसर,
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,
मंडल कार्यालय, सांगली.

२) कार्यकारी अभियंता,
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,
विभागीय कार्यालय, ग्रामीण सांगली. — विरुध्द पक्षकार

३) उपकार्यकारी अभियंता,
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,
उपविभागीय कार्यालय, तासगांव-२.

**कोरमः-** १. श्री.बी.जी.पवार,अध्यक्ष
२. श्री.जी.बी.पानकर, सदस्य सचिव
३. श्री.जी.सी.लेले,सदस्य

**महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग**
**(ग्राहक तक्रार निवारण मंच व विद्युत लोकपाल)**
**विनियम २००६ मधील ८.२ चे तरतुदीनुसार**

## <u>न्याय निर्णय</u>

श्री.बी.जी.पवार, अध्यक्ष, ग्रा.त.नि.मंच. कोल्हापूर, खालीलप्रमाणे न्याय निर्णय देत आहेत.

श्री.दिनकर आत्माराम जाधव,रा.राजापूर ता.तासगांव यांनी मंचाकडे वितरण कंपनी विरुध्द दि.०९.०६.२०१४ रोजी तक्रार दाखल केली. तक्रारदार यांनी अंतर्गत कक्षाकडे वितरण कंपनीविरुध्द वीज जोडणी खंडित करण्याबाबत तक्रार दाखल केली. अंतर्गत कक्षाने स्थळ तपासणी अहवाल तयार करुन कंपनीच्या नियमाप्रमाणे कारवाई करण्याचे आदेश दिले. त्याविरुध्द सदरचे अपील दाखल केले.

अर्जदार यांचे शेतजमीन गट क्र.९४३ मध्ये श्री.रामचंद्र आत्माराम जाधव यांचे नांवे वीज कनेक्शन घेतल्याने त्यास ग्राहकाचे भाऊ समाईक हिस्सेदार असून त्यांची संमती न घेता वीज जोडणी दिली आहे. इतर सहहिस्सेदाराची संमती घेतल्याविना वीजपुरवठा घेतल्याने तो खंडित करावा असा आदेश द्यावा.

मंचाने अशी तक्रार दाखल करुन घ्यायची की नाही याची प्रथम तपासणी करावी असे निरीक्षण ९ जून,२०१४ रोजी नोंदविले. वितरण कंपनीस आपले म्हणणे मांडण्यासाठी नोटीस बजावली. दि.२७.०६.२०१४ पूर्वी लेखी अहवाल देण्यास कळविले.

कार्यकारी अभियंता, ग्रामीण विभाग,सांगली, यांनी आपल्या दि. २६.६.२०१४ च्या लेखी अहवालात श्री.रामचंद्र आत्माराम जाधव यांचे नांवे शेतीपंपाचे वीज कनेक्शन गट क्र.९४३ मध्ये देण्यात आले. सदरचे कनेक्शन देतांना ७/१२ उता-यामध्ये तक्रारदार श्री.दिनकर आत्माराम जाधव यांचे नावाची मालकाची नांवे या रकान्यात नोंद नसल्याने श्री.रामचंद्र आत्माराम जाधव यांना वीजपुरवठा करतांना तक्रारदार यांची संमती घेतली नाही.

प्रस्तुत तक्रारीची सुनावणी मंचासमोर दि.१६.०७.२०१४ रोजी घेण्यात आली. तक्रारदाराचा मुलगा उपस्थित होता व त्यासोबत श्री.नीरजकुमार जाधव उपस्थित होते. वितरण कंपनीचे सहाय्यक अभियंता श्री.अभिजित दुधाळ उपस्थित होते. सदरचे वीज कनेक्शन मयत आत्माराम कृष्णा जाधव यांचे नांवे गट क्र.९४३ मध्ये आहे. तक्रारदाराचा पुणत्या श्री.निरजकुमार हे स्वतः सहहिस्सेदार आहेत व त्यांनी आज दि.१६.०७.२०१४ रोजी मंचासमोर आपले लेखी म्हणणे सादर केले. त्यामध्ये प्रामुख्याने माहिती अधिकार कायद्यानुसार दि.२१.०६.२०१३ रोजी दिलेल्या तपशीलाप्रमाणे सामायिक हिश्यामध्ये सहहिस्सेदारांची नांवे असल्यास संमती आवश्यक आहे. तरी हे वीज कनेक्शन गट क्र.९४३/४४ मध्ये देतांनाआमच्या कोणाची संमती घेतली नाही. सदरचे वीज कनेक्शन खंडित करण्याचा आदेश व्हावा. वितरण कंपनीच्या अधिका-यांनी लेखी अहवालात कथन केलेप्रमाणे म्हणणे मांडले व सोबत श्री.रामचंद्र आत्माराम जाधव यांच्या वीजजोडणीबाबत कागदपत्रे जोडली. त्यावरुन गट क्र.९४३ येथे वीज कनेक्शन दिल्याचे दिसते.

खालील मुद्दा न्यायनिर्णयासाठी मंचाकडे उपस्थित होतो.

**मुद्दा क्र.१:** तक्रारदार यांनी मागणी केलेप्रमाणे श्री.रामचंद्र आत्माराम जाधव यांचे गट क्र.९४३ मधील वीजपुरवठा खंडित करण्याचे आदेश देणे योग्य व कायदेशीर होईल काय ?

**उत्तर :** नाही.

## कारणमिमांसा

वादातीत कनेक्शन हे गट क्र.९४३ मध्ये आहे. तक्रारदाराचे कनेक्शन गट क्र.९४३ मध्ये आहे. त्याचा मीटर क्र.२८२०५०२६४३७३ आहे. तक्रारीत त्याचा उल्लेख नाही. मुळ कनेक्शन आहे ते आत्माराम कृष्णा जाधव मयत आहेत. तक्रारदाराचा मुलगा व पुतण्या मंचासमोर उपस्थित होते. सदर कनेक्शन त्यांच्या नांवे करण्यासाठी त्यांनी प्रयत्न केले नाहीत. तक्रारदाराच्या म्हणण्यानुसार माहिती अधिकारात मिळालेल्या माहितीनुसार सामायिक हिश्यामध्ये वीजजोडणी घेतांना सहहिस्सेदाराचे संमत्तीपत्र आवश्यक आहे. ते न दिल्याने दिलेला वीजपुरवठा वेकायदेशीर झाल्याने खंडित करावा कारण वीजपुरवठा घेतांना श्री.रामचंद्र आत्माराम जाधव यांनी आपल्या शपथपत्रात वीज कनेक्शनबाबत हरकत असल्यास वितरण कंपनीस जबाबदार धरणार नाही असे नमुद केले आहे.

तक्रारदार यांनी दि.३१.०५.२०१३ च्या कनिष्ठ अभियंता यांच्याकडे केलेल्या तक्रारीत शेतजमीन गट क्र.९४३ व गट क्र.९६४ या मध्ये श्री.रामचंद्र आत्माराम जाधव व श्री.जयसिंग आत्माराम जाधव यांचे नांवे वीज कनेक्शन जोडले आहे. प्रत्येक वीज कनेक्शन गट क्र.९४३ मध्ये आहे. गट क्र.९६४ मध्ये कुठलेही कनेक्शन नाही. सहहिस्सेदाराच्या संमतीविना वीजपुरवठा खंडित करण्यात येईल का ? या प्रश्नाचे उत्तर देणेपूर्वी तक्रारदाराला ग्राहक म्हणता येईल व तक्रार ग्राहक व वीज कंपनी यांचेमधील तक्रारीला **गा-हाणे** असे संबोधित करता येईल का ? यावर मंचाचे असे मत आहे की मुळ वीज कनेक्शन मयत आत्माराम जाधव यांचे आहे. तक्रारदार व मंचासमोर आलेले प्रतिनिधी यांनी सदर वीज कनेक्शन स्वतःच्या नावे करण्यासाठी कोणते ही प्रयत्न केले नाहीत. म्हणून ते वीज कंपनीचे ग्राहक होऊ शकत नाहीत. मयताच्या नावाने तक्रारदार कंपनीच्या विरुध्द मंचात तक्रार देऊ शकत नाही. तसेच वितरण कंपनीने वर्षापूर्वी म्हणजे दि.२९.०३.२०१३ रोजी दिलेला विद्युतपुरवठा खंडित करावा ही मागणी **"गा-हाणे"** (Grievance) या सदरात मोडते काय ? याबाबत मंचाचे उत्तर **नाही** असे आहे. कारण वीज कायदा CGRF Regulation २००६ मधील मराठी व्हर्शन (Version अनुवाद)

२. **व्याख्या**

२.१ या विनियमात, संदर्भानुसार वेगळा अर्थ अपेक्षित नसेल तर -

(३) **"गा-हाणे"** म्हणजे एखाद्या वितरण परवानेधारकाने परवाना, कंत्राट, करारान्वये किंवा आयोगाने विनिर्दिष्ट केलेल्या वीज पुरवठा संहितेखाली किंवा वितरण परवानेधारकांच्या कामगिरीच्या मानकांच्या संदर्भात पार पाडण्यासाठी स्विकारलेल्या कामगिरीचा दर्जा, स्वरुप, ती पार पाडण्याची पध्दत, यामधील कोणताही दोष, अपूर्णता, त्रुटी किंवा अपुरेपणा, ज्यात इतर बाबींबरोबरच (अ) जीवाला किंवा मालमत्तेला धोका ठरु शकणा-या वितरण यंत्रणेची सुरक्षितता आणि (ब) आयोगाच्या कोणत्याही आदेशाचे पालन न करणे किंवा त्या अनुषंगाने करावयाची कोणतीही कार्यवाही, जी मंच किंवा विद्युत लोकपालाच्या, जसे असेल तसे, अधिकारक्षेत्रात येत असेल, त्याबाबतचे गा-हाणे, यांचा समावेश होतो.

या व्याख्येप्रमाणे ग्राहकाच्या तक्रारीनुसार वितरण कंपनीने ग्राहकाला दिलेला वीजपुरवठा खंडित करावा अशी मागणी गा-हाणे सदरात मोडत नाही असे मंचाचे मत झाले आहे. त्यामुळे तक्रार या मंचासमोर चालू शकत नाही. त्यात मागणी केलेला वीजपुरवठा खंडित करण्याची मागणी गा-हाणे सदरात मोडत नाही. त्यामुळे मुद्दा क्र.१ चे उत्तर **नाही** असे देण्यात येते.

तक्रारदार यांनी माहिती अधिकाराखाली मिळविलेली दि.२१.०२.२०१३ च्या माहितीनुसार ७/१२ च्या उता-यावर विहिरीची नोंद सामायिक असल्याने अर्जदार हमीपत्र सादर करु शकतो. परंतु जर सहहिस्सेदाराच्या नावाचा उल्लेख जमीन करणा-यामध्ये विहिरीच्या नोंदीच्या ठिकाणी असल्यास संमती आवश्यक असते. परंतु केवळ याच कारणावरुन वितरण कंपनीला दिलेला वीजपुरवठा खंडित करण्याचा आदेश देणे अथवा ग्राहकाची मागणी मंजुर करणे वरील कारणासाठी योग्य होणार नाही असे दिसते. तसेच सहहिस्सेदार विहिरीतील पाणी उपसा करताच आपआपल्या हक्काची अंमलबजावणी करतांना विहिरीतील पाण्याचा हिश्श्याचा कमी जास्त उपसा होण्याच्या भितीपोटी केवळ संमतीचे कारणावरुन पाणी घेण्याचा हक्क सहहिस्सेदारास नाकारु शकत नाही. त्यामुळे तक्रारदार यांना आपला हक्क दिवाणी न्यायालयात शाबीत करुन घ्यावेत व त्यांना वितरण कंपनीविरुध्द योग्य ती कारवाई करण्यास मुभा आहे.

## <u>आदेश</u>

१. तक्रार फेटाळण्यात येत आहे.

२. या निर्णयाविरुध्द तक्रारदार यांना अपील करावयाचे असलेस त्यांना आदेशाच्या तारखेपासून ६० दिवसांचे आंत मा. विद्युत लोकपाल, केशवा. बांद्रा-कुर्ला कॉम्प्लेक्स,बांद्रा (पूर्व) मुंबई यांजकडे करता येईल.

सही/-
(बी.जी.पवार)
अध्यक्ष

श्री.जी.बी.पानकर, सदस्य सचिव .. सही/-

श्री.जी.सी.लेले, ग्राहक सदस्य .. सही/-

एकमताच्या आदेशाची अंमलबजावणी करण्यात यावी.